संगणक सांकेतांक -२०१११११०११६३२४३००१

**सरकारी कामगार अधिकारी गट -"ब"**
**पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती.**

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : नियुक्ती - २०११/प्र.क्र.११९/कामगार - ८
दिनांक :- २१ ऑक्टोबर २०११

**पहा :-** १) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ३७५/३१६/२००९/१५-अ, दि. १०.०५.२०११.
२) शासनपत्र समक्रमांक दि. २५.०५.२०११, दि. ३०.०५.२०११ व दि. ०६.०९.२०११
३) शासन निर्णय समक्रमांक दि.१९ सप्टेंबर २०११
४) कामगार आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र. आस्था/सकाअ/नियुक्ती/ २४७१/कार्या.२, दि.२२ सप्टेंबर २०११ व २५५६ दि.४ ऑक्टोबर २०११

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सरकारी कामगार अधिकारी गट "ब" या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी घेतलेल्या परिक्षेच्या निकालानुसार दि. १०.०५.२०११ च्या पत्रान्वये शिफारस केलेल्या ६४ उमेदवारांपैकी ४९ उमेदवारांची नेमणूक समक्रमांकाच्या दि.१९ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.आता,उर्वरित उमेदवारांपैकी ८ उमेदवारांच्या नेमणूकीबाबत कामगार आयुक्त यांचेकडून शिफारस करण्यात आली आहे.त्यानुसार सोबतच्या विवरणपत्रा मधील उमेदवारांची त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कामगार आयुक्त कार्यालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयात सरकारी कामगार अधिकारी या पदावर रु.९,३००- ३४,८०० ग्रेड पे. रु.४,४००/- या वेतनश्रेणीत परिविक्षाधीन नियुक्ती कामगार आयुक्त यांचेकडून प्राप्त अहवालांचे आधारे करण्यात येत आहे. या वेतनमानात ते ज्या दिनांकापासून पदभार स्विकारतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीवर राहतील. या उमेदवारांनी त्यांच्या पदाचा कार्यभार धारण केल्याबाबतचा अहवाल संबंधित कार्यालयाने कामगार आयुक्त यांस सादर करावा व कामगार आयुक्त यांनी याबाबत आवश्यक ती तपासणी करुन शासनास अहवाल सादर करावा.

**२.** या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी पदभार स्विकारावा अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**३.** उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर या शासन निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत विशिष्ट संयुक्त कारणासाठी हा कालावधी वाढवून देण्याची विनंती केली असेल व ती शासनाने गुणवत्तेवर मान्य केली असेल तर त्या वाढीव कालावधीच्या आत हजर झाले पाहिजे. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

**४.** विहित कालावधीत जे उमेदवार रुजू होणार नाहीत असे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने निश्चित केलेल्या गुणवत्ता यादीतील मिळविलेली जेष्ठता गमावतील.

५. विहित मुदतीत रुजू न झालेल्या उमेदवारांचा अहवाल कामगार आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्या अभिप्रायासह उचित कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठवावा.

६. त्यांनी पदग्रहण प्रतिवेदन कामगार आयुक्त, मुंबई यांच्या मार्फत सादर करावेत.

७. सदर उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, पोलीस तपास तसेच जात पडताळणी आणि इतर अनुषंगिक विहित प्रमाणपत्रांची संबंधित यंत्रणांकडून पडताळणी तसेच मुळ कागदपत्रांची पडताळणी याबाबतची कार्यवाही कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेमार्फत करण्यात आली आहे.

८. नियुक्तीच्यावेळी संगणक अर्हता प्राप्त न केलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय सा.प्र.वि. क्रमांक - प्रशिक्षण -२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च,२००३ अन्वये विहित केल्यानुसार या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांच्या सेवा आपोआप समाप्त होतील.

९. त्यांना परिविक्षा कालावधीमध्ये पहिल्या वर्षानंतरची वेतनवाढ देण्यात यावी आणि त्या पुढील वेतनवाढ परिविक्षा कालावधी समाधानकारक पूर्ण केल्यावरच देण्यात यावी.

१०. त्यांनी मराठी व हिंदी परिक्षा उतीर्ण केल्या नसतील किंवा त्यांना त्या परिक्षांतून सूट मिळाली नसेल तर विहित नियमानुसार त्यांना मराठी व हिंदी परिक्षाही उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा प्रचलित शासन नियमानुसार ते कारवाईस पात्र राहतील.

११. शासन निर्णय वित्त विभाग अंनिया-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१ ऑक्टोबर,२००५ मधील तरतुदीनुसार संबंधीत उमेदवारांना नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

१२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्यांच्या दि. १० मे,२०११ च्या पत्राने शिफारस केलेल्या या उमेदवारांच्या आणि इतर उमेदवारांच्या सेवाजेष्ठतेचे आदेश प्रचलित नियमानुसार यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

१३. त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास आणि / किंवा परिविक्षा कालावधीमध्ये विहित विभागीय परिक्षा उत्तीर्ण न केल्यास, त्यांचे काम किंवा वर्तणूक अयोग्य अथवा अननुरुप आढळल्यास अथवा त्यांनी सादर केलेली कोणतीही माहिती वा कागदपत्रे विहित नसल्याचे आढळल्यास ते सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील. तसेच रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता लक्षात घेवून जे उमेदवार सद्यस्थितीत शासकीय सेवेत आहेत त्यांचे गोपनीय अहवाल तपासणीच्या अधिन राहून सदर नियुक्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शासकीय सेवेतील अशा उमेदवारांनी रुजू होताना ते सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या कार्यालयाकडून त्यांचे गोपनीय अहवालाबाबत तसेच त्यांचे विरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कारवाई सुरु नसल्याबाबत प्रमाणपत्र / पत्र सादर करावे. अशा उमेदवारांचे गोपनीय अहवाल अपेक्षित दर्जाचे न आढळल्यास अथवा त्यांचे विरुध्द काही शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रलंबित असल्याचे आढळल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१४. त्यांना सेवेतून कमी करावयाचे झाल्यास शासन एक महिन्याची पूर्व सूचना देईल. मात्र, त्यांच्या सेवेच्या कालामध्ये दुर्वर्तन व सेवेच्या शर्तीचा भंग झाला तर अशी पूर्व सूचना न देता त्यांना कामावरुन कमी करण्यात येईल. पूर्व सूचनेचा एक महिन्याचा कालावधी शासन वेळोवेळी जे बदल करील त्या बदलांना अधिन राहून ठरविण्यात आलेला आहे.

जर त्यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी शासनाला कमीत कमी एक महिन्याची पूर्व सूचना देणे आवश्यक आहे.

१५. उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. उपरोक्त नमूद केलेल्या अटी व शर्तीसह महाराष्ट्र शासन सेवेत असलेल्या अधिकारी वर्गाला लागू असणारे इतर प्रचलित कायदे, नियम, शासन निर्णय इत्यादी सुध्दा या उमेदवारांना लागू राहतील.

१६. कामगार आयुक्त, मुंबई यांनी या उमेदवारांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.

१७. त्यांचा गोपनीय अभिलेख योग्य प्राधिकाऱ्याकडे प्रचलित नियमानुसार सादर करण्यात यावा.

१८. त्यांचा परिविक्षा कालावधी संपल्यानंतर कामगार आयुक्त, मुंबई यांनी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक - एसआरव्ही - १०६२/डि, दिनांक २६.०४.१९६३ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात त्यांच्याबाबत खास अहवाल (२ प्रती) शासनाकडे पाठवावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.**

( सुदिन गायकवाड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत - विवरणपत्र

प्रति :-

सर्व संबंधित उमेदवार (सोबतच्या विवरणपत्रानुसार)नोंदणीकृत पोचदेय डाकेने

प्रत:-

मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
सह सचिव/उप सचिव (कामगार)उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई -.
कामगार आयुक्त, कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, बांद्रा-कुर्ला संकुल, रिझर्व्ह बँकेसमोर, बांद्रा (पूर्व),मुंबई-४०० ०५१.
सह कामगार आयुक्त, मुंबई
अपर कामगार आयुक्त, मुंबई /पुणे/नागपूर
कामगार उप आयुक्त, औरंगाबाद / नागपूर / ठाणे / नाशिक
कामगार विभागाचे सर्व क्षेत्रीय जिल्हा कार्यालय प्रमुख
सर्व अध्यक्ष, माथाडी मंडळे/सर्व अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळे
अधिक्षक अभियंत्ता, जलसंपदा विभाग, पुणे (सी.पी. सर्कल)
महालेखापाल, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयत्ता), महाराष्ट्र - १, मुंबई
महालेखापाल, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयत्ता), महाराष्ट्र - २, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग / कार्या. १२ / १३ / १६-ब, मंत्रालय, मुंबई
सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी / उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. / निवड नस्ती कामगार - ८

## शासन निर्णय क्र नियुक्ती-२०११/प्र.क्र.११९/कामगार-८,दि.२१/१०/२०११ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र | उमेदवाराचे नाव व पत्ता | गुणवत्ता क्रमांक | जात प्रवर्ग/वर्गवारी | नियुक्तीची वर्गवारी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.कुटे अनिल उत्तम मु.सायखेडा.ता.निफाड, जि.नाशिक | ८ | भ ज/(ड) | भ ज/(ड) | सचिव,रेल्वे गुडस मंडळ, मुंबई |
| २ | श्री. शिर्के सुजीत तुकाराम ३४५,गुरुकृपा,चौधरी लेन, पाटण,मु.पो.ता.पाटण,जि. सातारा-४१५२०६ | १० | अराखीव | अराखीव | कामगार आयुक्त कार्यालय,मुंबई |
| ३ | श्री. पवार दत्तात्रय दादासो मु.पो.मरवडे,ता.मंगळवेढा, जि.सोलापूर-४१३३१९ | १४ | अराखीव | अराखीव | सहायक कामगार आयुक्त कार्यालय, इचलकरंजी |
| ४ | श्रीमती बनकर विशाखा विनायक प्लॉट नं११,सर्वे नं४७१,किंग्ज इंग्लिश स्कूलजवळ,नंदनवन कॉलनीच्या बाजूला,अंबड रोड,जालना-४३१२१३ | १६ | अजा/ (महिला) | अराखीव (महिला) | अपर कामगार आयुक्त कार्यालय,नागपूर |
| ५ | श्री. कावळे प्रविण भिमराव महात्मा फुले नगर,उमरगा ता.उमरगा, जि.उस्मानाबाद | ३४ | अ.जा | अ.जा | कामगार आयुक्त कार्यालय,मुंबई |
| ६ | श्रीमती नगरारे निशा वासुदेव १३६,मिसाळ ले आऊट,जरी पटका,नागपूर ४४००१४ | ४३ | अ.जा (महिला) | अ.जा (महिला) | अपर कामगार आयुक्त कार्यालय, नागपूर |
| ७ | श्री.इंगोले आनंद हंसाजी द्वारा,बी.व्ही.राजभोज ए-३,सतकर नगर,अंबड रोड,जालना जि.जालना | ५५ | अ.जा | अ. जा. | सरकारी कामगार अधिकारी कार्यालय,हिंगोली |
| ८ | श्रीमती धोत्रे सविता रामदास पी.एल.५/१२ रुम नं_०२, सेक्टर-१७,सिडको कॉलनी, नवीन पनवेल, ता. पनवेल जि.रायगड-४१०२०६ | ६३ | वि-जा/अ (महिला) | विजा/अ (महिला) | कामगार आयुक्त कार्यालय,मुंबई |